|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) मुंबई येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनसाठी उमविच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या चार स्वयंसेवकांची निवड झाली आहे. यात दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींचा समावेश आहे.

शिवाजी पार्क दादर, मुंबई येथे दि.२६ जानेवारी, २०१८ रोजी संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनासाठी ही निवड झाली आहे. यात प्रितम पाटील (आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर), विलास पाटील (जेडीएमव्हीपीएसचे,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव), सुवर्णा पाटील (एसएसव्हीपीएसचे,डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे) व रजनी पाटील (जी.टी.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार) यांचा समावेश आहे. निवड झालेले हे राष्ट्रीय सेवायोजनेचे स्वयंसेवक दि. १६ जानेवारी रोजी मुंबई येथे रवाना झाले असून ते दि. १७ ते २६ जानेवारीपर्यंत सराव व प्रत्यक्ष संचलनात सहभागी होणार आहेत. या रासेयोच्या स्वयंसेवकांनी विविध शिबीरात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील व विद्यार्थी विकास व रासेयोचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : १७ जानेवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी